सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षकांना प्रशिक्षण देण्यासाठी प्रशिक्षण संस्थेची नियुक्ती करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
शासन निर्णय क्र : एसजीए-२०१६/प्र.क्र.४५६/कामगार-५
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,
दिनांक : ०७ फेब्रुवारी, २०१८

वाचा: शासन निर्णय :- क्र एसजीए-२०१६/प्र.क्र.४५६/कामगार-५, दि १३ सप्टेंबर, २०१७

प्रस्तावना :

महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ अंतर्गत व महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) योजना, २००२ मधील तरतुदीनुसार सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षकांना प्रशिक्षण देण्याबाबतची कार्यपध्दती संदर्भाधिन दि.१३ सप्टेंबर,२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आली होती. तथापी, सदर कार्यपध्दतीमध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत शासनाने आता खालील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय:

महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ अंतर्गत स्थापन केलेल्या सुरक्षा रक्षक मंडळांतील नोंदित सुरक्षा रक्षकांना खाजगी सुरक्षा एजन्सी (नियमन) नियम, २००७ खालील अभ्यासक्रमाच्या धर्तीवर प्रशिक्षण देण्यासंदर्भात, सुधारीत कार्यपध्दती तथा मार्गदर्शक तत्वे खालील प्रमाणे राहतील.

१) प्रशिक्षण देण्याच्या दृष्टीने प्रशिक्षणाचा कार्यक्रम निश्चित करणे, विषय निश्चित करणे, प्रशिक्षण संस्थेची विहित अटी व शर्तीच्या अधिन राहून निवड करणे इ. बाबत सहायक कामगार आयुक्त तथा अध्यक्ष, बृहन्मुंबई व ठाणे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ यांनी त्यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करावी. सदर समितीने राज्यातील सर्व नोंदीत सुरक्षा रक्षकांना प्रशिक्षण देण्याचे उद्दिष्ट समोर ठेवून, उप महासमादेशक , होमगार्ड, महाराष्ट्र राज्य , मुंबई यांनी खाजगी सुरक्षा रक्षक प्रशिक्षण केंद्र सुरु करण्याकरिता मंजूर केलेली परवाना धारक (अनुज्ञाप्ती) संस्था, प्रशिक्षण देण्यास इच्छुक आहे किंवा कसे, ही बाब तपासून घ्यावी. तसेच सदर संस्थांच्या प्रशिक्षण केंद्रावर प्रत्यक्ष भेट देऊन त्यांच्याकडील प्रशिक्षणासंदर्भातील उपलब्ध पायाभूत सुविधा, प्रशिक्षणाची कार्यपध्दती इ. बाबत पहाणी करावी. अशा परवानाप्राप्त संस्थांमधील नोंदीत सुरक्षा रक्षकांना प्रशिक्षण देण्याच्या दृष्टीने निकषानुसार पात्र संस्थांची प्राथमिक यादी निश्चित करण्यात यावी.

२) समितीने निवड केलेल्या संस्थांच्या प्राथमिक यादीनुसार प्रशिक्षण संस्थेची अंतिमत: निवड करण्यासंदर्भात सहायक कामगार आयुक्त तथा अध्यक्ष, बृहन्मुंबई व ठाणे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ यांनी यथोचित निवड प्रक्रिया राबवावी आणि अंतिमत: पात्र ठरलेल्या संस्थांच्या निवड यादीस शासनाची मान्यता घ्यावी.

३) निवड यादीतील प्रशिक्षण संस्था खाजगी सुरक्षा रक्षकांना प्रशिक्षण देण्यास पात्र राहतील

४) अशा संस्थांमार्फत आयोजित होणा-या प्रशिक्षणाचा खर्च बृहन्मुंबई व ठाणे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळामार्फत करण्यात येईल.

५) नोंदीत सुरक्षा रक्षकांना वरील प्रमाणे प्रशिक्षण देण्याकरिता निवड केल्यानंतर त्यांच्या जागी पर्यायी सुरक्षा रक्षकाची नेमणूक, नोंदित व उपलब्ध सुरक्षा रक्षकांमधूनच संबंधित सुरक्षा मंडळाने करणे आवश्यक राहील.

६) प्रधान सचिव (कामगार) किंवा कामगार आयुक्त यांनी नियुक्त केलेले सक्षम प्राधिकारी हे प्रशिक्षण कार्यक्रमाची वर्षातून किमान दोन वेळा किंवा गरजेनुरुप वेळोवेळी तपासणी करतील.

(७) नोंदीत सुरक्षा रक्षकांनी प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केल्याबाबत संबंधित सुरक्षा रक्षकांची यादी व प्रमाणपत्र सबंधित सुरक्षा मंडळातील सक्षम प्राधिका-याकडे, प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर १५ दिवसात सादर करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

दि १३/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयामध्ये नमूद कार्यपध्दतीतील सूचना अ.क्र.(३) ते (७) मधील कार्यपध्दतीत कोणताही बदल करण्यात आलेला नाही. वरील सर्व सूचनांचे तंतोतंत पालन करण्याची जबाबदारी सहायक कामगार आयुक्त तथा अध्यक्ष, बृहन्मुंबई व ठाणे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ यांची राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०१८०२०७१४३९२६०९१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Digitally signed by Sanjay Vithoba Kalbhor
Date: 2018.02.08 11:59:15 +05'30'

(संजय काळभोर)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.

२) मा.मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव.

३) मा.राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव.

४) प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहायक.

५) उप सचिव (कामगार), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.

६) कामगार आयुक्त, कामगार भवन, सी-२०,ई ब्लॉक, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१

७) सह कामगार आयुक्त, कामगार भवन, सी-२०,ई ब्लॉक, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे(पूर्व), मुंबई-५१

८) उप कामगार आयुक्त, कामगार भवन, सी-२०,ई ब्लॉक, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे(पूर्व), मुंबई-५१

९) सहायक कामगार आयुक्त, कामगार भवन, सी-२०,ई ब्लॉक, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे(पूर्व), मुंबई-५१.

१०) महाराष्ट्र राज्य सुरक्षा रक्षक सल्लागार समितीचे सर्व सन्माननीय सदस्य.

११) अध्यक्ष, सर्व सुरक्षा रक्षक मंडळे.

१२) निवडनस्ती (कामगार-५).